नियमित दिवाणी दावा क्र. २७/२०१५

**निशाणी ७२ वरील आदेश**

१. प्रतिवादी क्र.३ ने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ७ नियम ११ अन्वये वादीचा दावा रद्द होण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादीने आपल्या अर्जातुन प्रामुख्याने असे कथन केले आहे की, वादीने प्रतिवादी यांचे विरूध्द दावा जमिन गट नं.६ मधून चालू वितरिकेचे काम स्वतः अगर इतरामार्फत करू नये म्हणून निरंतरची ताकीद मिळण्यासाठी तसेच रक्कम रू.१५,००,०००/– (रू. पंधरा लाख)ची मागणी केलेली आहे. यातील वादीने सदरचा दावा दाखल करीत असताना त्यामध्ये रक्कम रू.१५,००,०००/– ची मागणी केलेली असल्यामुळे सदर रकमेवर यातील वादीने मे. कोर्टात योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प दिलेला नाही. त्यामुळे वादीचे दाव्यास सि.पी.सी. कलम ७, नियम ११ ची बाधा येत असून वादीचा दावा या कारणास्तव रद्द होण्यास पात्र आहे.

३. प्रतिवादीने पुढे असे कथन केले आहे की, दाव्यात वादीने नुकसान भरपाई मागितलेली असून भूसंपादनातील योग्य नुकसान भरपाईचा अधिकार व स्थानांतरण, पुर्नःस्थापना आणि पुर्नवसन अधिनियम २०१३ चे कलम ६३ नुसार राज्य घटनेच्या कलम २२६ किंवा २२७ नुसार मा. उच्च न्यायालय अगर मा.सर्वोच्च न्यायालय वगळता कोणतेही दिवाणी न्यायालयात तो दावा चालवू शकत नाही. भूसंपादनासंबंधी कोणताही वाद जिल्हाधिकारी किंवा प्राधिकरणाला या अधिनियमाने/नुसार चालविण्याचा अधिकार दिलेला आहे. त्यामुळे या संर्दभात

दिवाणी न्यायालय कोणताही मनाई हुकुम देवू शकत नाही. त्यामुळे वादीचा दावा प्रस्तुत मे. कोर्टास चालविणेचा मुळीच कायद्याने हक्क व अधिकार नाही. सबब वादीचा दावा याही कारणास्तव रद्द करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी क्र.३ ने केली आहे.

४. वादी यांनी नि.७४ अन्वये प्रतिवादी यांनी दिलेल्या अर्जास खुलासा दाखल करून प्रतिवादीच्या प्रस्तुत अर्जास विरोध दर्शविला आहे. आपल्या खुलासातून प्रतिवादीने दिलेल्या अर्जात केलेली कथने वस्तुस्थीतीस धरून नसल्यामुळे सदरचा अर्ज देण्याचा प्रतिवादी यांना अधिकार नाही, असे कथन केले आहे. वादी पुढे कळवितो की, वास्तविक पाहता यांतील वादी यांनी प्रस्तुत दावा प्रतिवादी यांचे विरूध्द निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यास प्रतिवादी यांनी म्हणणे सादर केले आहे. त्यानंतर निशाणी क्र.५ चा अर्ज चालून निकाली झाला आहे व सदरचे निशाणी ५ चे अर्जा विरूध्द किरकोळ अपिल दाखल होवून निकाली झाले आहे. दावा दाखल करून बराच कालावधी लोटून गेला आहे आता यापरिस्थीतीस प्रतिवादीस सदरचा अर्ज देणेचा हक्क राहीलेला नाही. सबब सदरचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे व तो नामंजूर करण्यात यावा असे वादीने विनंती केली आहे.

५. वादी व प्रतिवादी यांच्या कथनाच्या अनुषंगाने माझे विचारार्थ अर्जाच्या निर्णयाकरीता खालील वादप्रश्न उपस्थित होतात. त्यावरील माझे निष्कर्ष हे यानंतर नमूद केलेल्या कारणमिमांसेला अनुसरून पुढीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अ. क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | न्याय नुकसानभरपाई मिळण्याचा आणि भूमि संपादन, पुनर्वसन व पुर्नवसाहत यांमध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ६३ प्रमाणे प्रस्तुत दावा | ...नाही. |

| | | |
|---|---|---|
| | चालविण्यास या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रास बाधा येते ? | |
| २. | वादीने योग्य न्यायालयीन शुल्क न भरल्याच्या कारणामुळे वादीचा दावा रद्द होण्यास पात्र आहे काय ? | ...नाही. |
| ३. | वादीचा दावा कायदयाप्रमाणे टिकण्याजोगा आहे काय ? | होय. |
| ४. | अंतिम आदेश काय ? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

दोन्ही पक्षकारांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. दाव्याच्या कामी दाखल असलेल्या कागदपत्रांची पाहणी केली.

**मुद्दा क्र.२ –**

६. वादीने योग्य न्यायालयीन शुल्क भरलेले नाही व वादीचे दाव्यास संबंधीत कायदयाच्या तरतुदींची बाधा येते या तक्रारींच्या आधारे वादीचा दावा या न्यायालयातून काढून टाकण्यात यावा अशी तक्रार प्रतिवादीने या अर्जातून केलेली आहे. प्रतिवादीच्या विद्वान वकिलांनी आपल्या युक्तीवादातून असे कथन केले आहे की, वादीने दाव्यामध्ये प्रतिवादींकडून रक्कम रूपये १५,००,०००/– या रकमेची मागणी केलेली आहे. मात्र सदर रकमेवर वादींनी योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प न दिल्यामुळे वादीचा हा दावा कायदयाप्रमाणे चालू शकत नाही व तो काढून टाकण्यास पात्र आहे. आपल्या युक्तीवादातून वादीच्या विद्वान वकिलांनी प्रामुख्याने असा मुद्दा उपस्थित केला आहे की, दावा दाखल केल्यापासून बराच कालावधी लोटून गेलेला आहे. अशा परिस्थीतीत प्रतिवादीस सदरचा अर्ज देण्याचा हक्क उरलेला नाही . त्यामुळे अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे असे कथन केलेले आहे . मात्र वादीच्या

खुलाश्याचे बारकाईने वाचन केले असता तसेच वादीतर्फे करण्यात आलेला युक्तीवाद विचारात घेतला असता असे निर्दशनास येते की,वादीच्या दाव्यासंबंधी जे मुद्दे प्रतिवादीच्या वकिलांनी उपस्थीत केलेले आहेत, त्याचा योग्यप्रकारे खुलासा वादीतर्फे करण्यात आलेला नाही. केवळ अर्ज उशीराने दिल्यामुळे अर्ज न टिकण्याजोगा आहे असे म्हणता येणार नाही. याचे कारण म्हणजे दाव्यासंबंधी कायदेशीर मुद्दा कोणत्याही टप्पा दरम्यान उपस्थीत करण्याचा अधिकार प्रतिवादीस असतो. त्यामुळे वादीतर्फे सदर अर्जाबाबत जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यात कोणतेही तथ्य नाही असे म्हटले पाहिजे.

७. प्रतिवादींनी उपस्थित केलेला न्यायालयीन शुल्काबाबतचा मुद्दा हा कायदेशीर मुद्दा असल्याने त्यात तथ्य आहे की कसे हे पाहणे गरजेचे आहे. वादीच्या दाव्याचे वाचन केले असता असे दिसून येते की, वादींनी नुकसान भरपाई म्हणून रूपये १५,००,०००/–रक्कमेची मागणी केलेली आहे. तथापी न्यायालयीन शुल्क मात्र रू.२००/–भरलेली आहे. न्यायालयीन शुल्क हे दाव्यात नमुद केलेल्या निरंतरच्या ताकीदीसाठी अदा केलेली आहे असे दिसते. तथापी वादीने आपल्या दाव्यात प्रतिवादी यांचेकडून नुकसान भरपाई म्हणून रक्कम रू.१५,००,०००/– मिळावे अशी देखील मागणी केलेली आहे. या ठिकाणी असे नमुद करणे गरजेचे आहे की, ज्या कायदेशीर तरतुदीनुसार दाव्याची आकारणी केली जाते ते योग्य आहे की कसे हे प्रथम निश्चित होणे आवश्यक असते. महाराष्ट्र न्यायालयीन शुल्क अधिनियम २०२० चे कलम ८ मध्ये अशी तरतूद आहे की, जर वादीने योग्य न्यायालयीन शुल्क अदा केलेला नाही असे मत मे. न्यायालयाचे झाल्यास त्याबाबत चौकशी करून चौकशी अंती वादीने योग्य न्यायालयीन शुल्क भरलेला आहे की नाही हे निश्चीत करणे गरजेचे असते. मात्र प्रस्तुत प्रकरणामध्ये अशी कोणतीही न्यायालयीन शुल्काबाबत चौकशी झालेली नाही व वादीने जमा केलेला न्यायालयीन शुल्क हा अयोग्य आहे

असे देखील अद्याप निश्चीत झालेले नाही. अशा वेळी वादीने योग्य न्यायालयीन शुल्क जमा केला नाही या कारणास्तव वादीचा दावा या घडीला रद्द करता येणार नाही म्हणून मी मुद्दा क्र.२ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.१, ३ व ४–**

८. सदरचे मुद्दे हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्याची चर्चा एकत्रीतपणे करण्यात येत आहे. वादीच्या दाव्यास संबंधीत कायदयाची बाधा येते त्यामुळे वादीचा दावा काढून टाकण्यास पात्र आहे असे प्रतिवादीचे म्हणणे आहे. ज्याअर्थी प्रतिवादींनी वादीच्या दाव्यास विशिष्ट कायदयाची बाधा येते अशी तक्रार केलेली आहे त्याअर्थी संबंधीत तरतुदींचे काळजीपुर्वक वाचन करणे आवश्यक आहे.

**'न्याय नुकसानभरपाई मिळण्याचा आणि भूमि संपादन, पुनर्वसन व पुर्नवसाहत यांमध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ६३ '**

**कलम ६३-दिवाणी न्यायालयांच्या अधिकारितेस रोध -**

**-'**कोणत्याही दिवाणी न्यायालयास, (संविधानाच्या अनुच्छेद २२६ किंवा २२७ खालील उच्च न्यायालयाव्यतिरिक्त किंवा सर्वोच्च न्यायालयाव्यतिरिक्त) जिच्या बाबतीत, या अधिनियमाद्वारे किंवा त्यान्वये जिल्हाधिका-यास किंवा प्राधिकरणास अधिकार आहे अशा जमिनीच्या संपादनाशी संबंधित असणारा कोणताही विवाद दाखल करून घेण्याची अधिकारिता असणार नाही, आणि अशा कोणत्याही प्रकरणाच्या बाबतीत, कोणत्याही न्यायालयाद्वारे, कोणताही मनाई हुकुम देणार नाही’.

**टीप-** उच्च न्यायालये व सर्वोच्च न्यायालयाव्यतिरिक्त अन्य दिवाणी न्यायालयांना,या अधिनियमाखालील जमिनीचे संपादन करण्याच्या संबंधातील कोणताही विवाद दाखल करून घेण्याची अधिकारिता असणार नाही अशी तरतूद या कलमामध्ये केली आहे.

९. प्रतिवादीचे विद्वान वकिलांनी आपल्या युक्तीवादातून असे कळविले आहे की, निरा उजवाकालवा, त्यावरील शाखा कालवे व वितरीका ही ८० वषार्पुर्वीची ब्रिटीश कालीन सिंचन प्रणाली आहे. निरा उजवा कालवा शाखा क्र.३ वरील वितरीका क्र. ७अ ही फार वर्षापूर्वी तयार केलेली आहे. सदरची वितरीका ही त्यावेळी खोदून

पूर्ण झालेली आहे. त्या वितरीकेतून येणा–या पाण्याचा वापर हजारो शेतकरी करीत होते व आहेत. बरीच वर्षे सदरच्या वितरीकेचे दुरूस्तीचे काम केलेले नव्हते म्हणून महाराष्ट्र शासनाने दि.३.३.२०१२ रोजीच्या निर्णयान्वये दुरूस्तीच्या प्रस्तावास मंजूरी दिलेली आहे. त्याप्रमाणे सदरच्या वितरीकेचे काम पूर्ण करणे ही या प्रतिवादीची जबाबदारी आहे. दि.३.३.२०१२ रोजीच्या निर्णयान्वये या प्रतिवादींनी वितरीका क्र.७अ च्या दुरूस्तीच्या कामाचे टेंडर जाहीर करून दुरूस्तीचे काम ठेकेदाराने चालू केलेले आहे. त्याप्रमाणे वादीचे वाद मिळकतीपर्यंत दुरूस्तीचे काम आल्यानंतर यातील वादीने हरकत घेतल्यामुळे व अडवणूक केल्यामुळे वाद मिळकतीमधून जाणा–या कॅनॉलचे काम थांबले व त्यापुढील काम सुरू असून ते अंतिम टप्यात आहे. त्यामुळे वादीचे दाव्यास कोणतेही कारण घडलेले नाही असे प्रतिवादींचे म्हणणे आहे.

१०. वादीच्या विद्वान वकिलांनी आपल्या युक्तीवादातून असे कळविले आहे की, मौजे उंबरगाव, ता.पंढरपूर निरा उजवा कालवा शाखा क्र.३ वरील वितरिका क्र.७अ चे कॅनॉलचे काम करणेचे ज्ञापन मुख्य अभियंता जलसंपदा विभाग पुणे यांनी दि.८.८.२०१४ रोजी दिले व त्यानुसार सदरचे कामाची निवीदा यातील प्रतिवादी नं.४ यांनी घेतली व सदरचे काम यातील प्रतिवादी नं.३ चे मार्गदर्शनाखाली व देखरेखीखाली करणेचे ठरले. वास्तविक पाहता सदरील कॅनॉलच्या वितरीकेचे कामाची कोणत्याही प्रकारची नोटीस यातील वादीस दिली नाही. तसेच वादीचे मालकीचे किती क्षेत्र सदरील वितरिकेसाठी बाधित होणार आहे, याबाबत कोणत्याही प्रकारचा खुलासा दिलेला नाही अथवा त्याबद्दलची भुसंपादनाची कसल्याही प्रकारची प्रक्रिया राबविलेली नाही. तसेच सदरील प्रतिवादी यांना वादीचे मिळकतीतून वितरीका घालविणेचा कोणताही आदेश प्राप्त नाही व प्रस्तावीत वितरीका वादीचे मिळकतीतून जात नाही, याची जाणीव यातील प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना आहे. असे

असताना गावातील प्रतिष्ठीत लोकासमक्ष वादीचे मिळकतीचे पश्चिमेकडून वळून पुढे दक्षिण बाजुने रस्त्याचे जवळून पुढे वादीचे राहते घराचे मागील बाजुने सदरील वितरीका घालविण्याचे तयारी सुरू केली आहे. त्याप्रमाणे वादीचे जमिनीत सुमारे १० फुट खोल चर पाडण्यात आली आहे. त्यामुळे वादीचे सुमारे २० गुंठे क्षेत्र वाया गेले असून सुमारे १५ लाखाचे नुकसान झाले आहे असे वादीचे सांगणे आहे.

११. सदरची वितरीका ही आधीच काढण्यात आली असून ती लोकांच्या हितासाठी व शेतक–यांना शेतीसाठी पाणी मिळण्यासाठी खोदलेली आहे, असे प्रतिवादींचे म्हणणे आहे. त्यांचे कथनानुसार गट नंबर ६ मधून जाणारी वितरीका ही १०.५० मीटर रुंदीची आहे. त्यामध्ये ३.६० मीटर हे सर्व–हीस रोडसाठी व आय.पी. साईटसाठी १.५० मीटर असून कॅनॉलची रूंदी ५.२० मीटर आहे. त्याप्रमाणेच पुर्व नियोजीत असलेल्या कॅनॉलचे दुरूस्तीचे काम होणार आहे. अश्यावेळी नव्याने भूसंपादन करण्याचा व नुकसानभरपाई देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्यामुळे वादीने दाखल केलेला दावा वस्तुस्थितीशी धरून नाही व तो रद्द करणेस पात्र आहे असे प्रतिवादीचे म्हणणे आहे.

१२. प्रतिवादीने वादीच्या दाव्याबाबत वरीलप्रमाणे तक्रारी केल्या असल्याने वादीने दाव्यास कोणते कारण घडल्याचे दाखविले आहे हे पाहणे गरजेचे आहे. वादीच्या वादकथनानुसार सदर वितरीकेचे काम प्रत्यक्षात पक्क्या स्वरूपात करत असताना यातील प्रतिवादी क्र.४ ने प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे अधिका–यांशी संगणमत करून वर नमुद केलेल्या चारीच्या ऐवजी वादीच्या दुस–या क्षेत्रातून सदर वितरीकेचे काम करणार असल्याबाबत वादीस नुकतेच समजले. त्याप्रमाणे वादीचे कुटुंबातील लोकांनी प्रतिवादी क्र.४ चे कामगार व इंजीनिअर यांचेकडे चौकशी केली

असता आम्ही तुमच्या दुस–या क्षेत्रातून वितरीकेचे काम पुर्ण करणार आहोत व नंतर लगेचच हे काम केले जाईल असे सांगितले.

१३. या ठिकाणी नमुद करणे गरजेचे आहे की, दावा प्रलंबित असताना वादीने दाव्यात दुरूस्ती करून कलम ८–अ मध्ये मजकूर नमूद करून प्रतिवादींनी दावा मिळकती मधून बेकायदेशीरपणे कॅनॉलचे काम चुकीच्या पध्दतीने पूर्ण केल्याचे नमूद केलेले आहे. सदर कामामुळे वादीचे २० गुंठे क्षेत्र वाया गेल्याचे देखील नमुद केलेले आहे. वादीच्या दाव्याचे बारकाईने वाचन केले असता असे दिसून येते की, कोणत्याही वितरिकेसाठी वादीच्या दावा मिळकतीपैकी कोणतेही क्षेत्र संपादीत झाल्याचा उल्लेख वादीने दाव्यात केलेला नाही. उलट कोणतेही क्षेत्र संपादीत न करता प्रतिवादींनी चुकीच्या पध्दतीने दावा मिळकतीतून वितरीकेचे काम पूर्ण केलेले आहे अशी तक्रार वादीने केलेली आहे.

१४. प्रतिवादींचे तथाकथीत बेकायदेशीर कृत्यामुळे वादीचे दावा मिळकतीचे नुकसान झालेले असून त्या नुकसानीपोटी वादीने प्रतिवादीकडून रक्कम रू.१५,००,०००/–ची मागणी प्रस्तुत दाव्यात केलेली आहे. यावरून असे दिसून येते की, वादीच्या दाव्यात जमीन संपादनाच्या कारवाईबाबत व त्याच्या अनुशंगाने मिळणा–या नुकसान भरपाईबाबतचे कोणतेही कथन वादीने त्यात केलेले नाही. त्यामुळे संपादनाच्या कायदयाच्या तरतुदीचा कोणताही भाग या दाव्याचा वाद विषय नाही. प्रतिवादींच्या तथाकथीत बेकायदेशीर कृत्यामुळे वादीस झालेल्या तथाकथीत नुकसानी बाबत भरपाई मिळण्यासाठी वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. वादीच्या सदर तक्रारीमध्ये तथ्य आहे की कसे हे दोन्ही पक्षकारांतर्फे दाखल होणा–या पुराव्यावरून निश्चीत होणार आहे. मात्र वादी हा दावा मिळकतीचा मालक असल्यामुळे दावा मिळकती बाबत दाद मागण्याचा त्याला अधिकार आहे. तरी वरील

चर्चेवरून मी या निष्कर्षापर्यंत पोहोचले आहे की, वादीच्या दाव्यास सदर कायदयाचे कलम ६३ प्रमाणे बाधा येत नाही. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत असून मुद्दा क्र.३ चे उत्तर होकारार्थी देत आहे व मुद्दा क्र.४ चे उत्तरार्थ पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

Sd/-

(श्रीमती एस. एस. पाखले)

दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,

पंढरपुर

दि. २९/११/२०२३

## नियमित दिवाणी दावा क्र. २७/२०१५

**निशाणी ७२ वरील परिणामक आदेश**

अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

Sd/-

(श्रीमती एस. एस. पाखले)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,
पंढरपुर

दि. २९/११/२०२३

# CERTIFICATE

I affirm that, the contents of the this P.D.F file Order/Judgment are same word to word, as per the original order/ judgment

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Vallal L. M. |
| Court Name | : | Civil Court Senior Division, Pandharpur |
| Date | | 29/11/2023 |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 11/12/2023 |
| Order uploaded on | : | 11/12/2023 |